प्रेसनोट

दिनांक – ०२/११/२०१६

## मोबाईल चोराकडुन दोन लाख एकवीस हजाराचे वीस मोबाईल हस्तगत

श्री तुषार अशोक गालिंदे वय – ३० रा – ४८९ गुरुवार पेठ गिरीघर समृध्दी पुणे हे दिनांक – २५/१०/२०१६ रोजी दुपारी जेवन करुन झोपले त्यावेळी त्यांनी त्यांचा रिलायन्स लाईफ कंपनीचा मोबाईल फोन चार्जिंगला लावलेला होता दुपारी ०३/४५ ते ०६/०० वाजण्याचे दरम्यान अज्ञात चोरटयाने घरात प्रवेश करुन त्यांचे नकळत फोन चोरुन नेला होता त्याचदरम्यान त्या बिल्डिंगमध्ये राहणारे श्री मितेश वसंत डेडीया यांचे घरातील यु कंपनीचा मोबाईल फोन व श्री यश किशोर रजपुत रा – २०९ गुरुवार पेठ कृष्णा हाईट पुणे यांचे घरातील लावा कंपनीचा मोबाईल फोन चोरीस गेले होते त्याबाबत तुषार गालींदे यांनी खडक पोलीस स्टेशन पुणे याठिकाणी फिर्याद दिलेली आहे.

खडक पोलीस स्टेशन पुणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी हददीत पेट्रोलिंग फिरत असताना पोलीस कर्मचारी इम्रान नदाफ यांना त्यांचे गुप्त खब-याकडुन मिळालेल्या माहीतीनुसार पोलीसांनी श्रीदत्त हॉटेल घोरपडे उदयान मागे पुणें या ठिकाणी सापळा लावुन संशयीत इसम रियाज शाकिर शेख वय – २० रा – ५४ जी पी ४४ लोहीयानगर पुणे यास पकडले आहे त्यावेळी त्याचे जवळ चोरीचे मोबाईल फोन मिळाले त्यामध्ये सॅमसंग, लावा, एलजी, एलवायएफ, नोकीया, मायक्रोमॅक्स, वायओ४७११ या कंपनीचे मोबाईल फोन मिळाले आहे आरोपी दुपारच्या वेळी रेकी करुन घरातील झोपलेले असताना त्याचा फायदा घेवुन मोबाईल चोरी करत असल्याचे तसेच त्याने गंज पेठ, घोरपडे पेठ, लोहीयानगर, या भागात चोरीचे गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहे.

मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सहावे पुणे शहर यांचे न्यायालयात आरोपीस हजर केले असता त्यांनी दिनांक-०३/१२/२०१६ रोजी पर्यंत त्यास पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यादरम्यान त्यांचेकडे पोलीसांनी तपास केला असता त्याने गंज पेठ, घोरपडे पेठ, लोहीयानगर या भागातील घरातील मोबाईल चोरल्याचे सांगीतले आहे त्याचेकडुन पोलीसांनी सॅमसंग, लावा, एलजी, एलवायएफ, नोकीया, मायक्रोमॅक्स, वायओ४७११ या कंपनीचे वेगवेगळया मॉडेलच वीस मोबाईल फोन जप्त केलेले आहे. पोलीसांनी त्याचेकडे बारकाईने सखोल तपास करुन दोन लाख एकवीस हजार रुपये किंमतीचे एकुण वीस मोबाईल फोन जप्त केलेले आहेत त्याबाबत पुढील तपास चालु आहे. ज्या नागरिकांचे मोबाईल फोन चोरीस गेले आहेत त्यांनी खडक पोलीस स्टेशन पुणे फोन नंबर ०२०२४४५२०९५ अथवा मोबाईल नंबर – ९९२३०३२४७७ किंवा ९८२२७९८८७७ या फोनवर संपर्क साधावा असे आवाहन पोलीसांनी केले आहे.

सदर कामगिरी परिमंडळ १ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री सुधीर हिरेमठ, शहर विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री प्रविण कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली श्री रघुनाथ जाधव वरिष्ठ पोलीस स्टेशन खडक पोलीस स्टेशन पुणे, श्री. संभाजी शिर्के पोलीस निरीक्षक (गुन्हे) खडक पोलीस स्टेशन पुणे व तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक अनंता व्यवहारे व पोलीस कर्मचारी बशीर सैय्यद, सर्फराज शेख, महेश बारवकर, विदयाधर गांगुर्डे, अनिकेत बाबर, मिलींद धोत्रे यांनी केलेली आहे.

